लोकमत

# विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर : प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे 'स्टार रेटिंग प्रोग्राम' या प्रदूषण मूल्यमापन प्रणालीची माहिती देण्यासाठी विद्यापीठात आज, बुधवारी सकाळी साडेअकरा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा होणार आहे. विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग, उद्योग केंद्र आणि शिकागो एनर्जी पोलिसी या संस्थेतर्फे कार्यशाळा आयोजित केली आहे. त्यामध्ये पी. डी. राऊत, उदय गायकवाड, आदी मार्गदर्शन करणार आहेत.

Kolhapur Main
Page No. 2 Aug 08, 2018
Powered by: erelego.com

# 'हिंसाचार प्रतिबंध कायदा शाहूंच्या दूरदृष्टीचे द्योतक'

कोल्हापूर टाइम्स टीम

'राजर्षी शाहू महाराज यांनी शंभर वर्षांपूर्वी लागू केलेल्या कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्याची औचित्यतिता आजही महत्त्वाची आहे. आजच्या घडीला कौटुंबिक हिंसाचारामुळे निर्माण होणारी गंभीर परिस्थिती पाहता हा कायदा म्हणजे शाहूच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या कै. शारदाबाई पवार अध्यासनातर्फे शाहू महाराजांच्या कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'महिलांवर कुटुंबातच हिंसाचाराच्या घटना आजही मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. शाहू महाराजांच्या संस्थानकाळात स्त्रीयांसाठीही न्याय योजना करण्यात आल्या होत्या. कुटुंबातच जर स्त्रीचा



सन्मान झाला तरच तो समाजात होणार आहे हा संदेश देणारा हा कायदा शाहू महाराजांनी केला.'

यावेळी शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा व आजचे वास्तव या विषयावर डॉ. मंजुश्री पवार व तनुजा शिपूरकर यांनी विचार मांडले. डॉ. भारती पाटील यांनी सत्राचे अध्यक्षस्थान भूषवले. दुसऱ्या सत्रात सध्या आस्तित्वात असलेल्या कायदा व आजचे वास्तव या विषयावर डॉ. मेधा पानसरे व अॅड. आसावरी कुलकर्णी यांनी विवेचन केले. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. नंदा पारेकर यांनी भूषवले. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. मानसिंग टकले, डॉ. ए. बी. मोहळकर, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते.

## तिसरा डोळा



■ कोमल घाटगे, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# विद्यापीठामध्ये हवा प्रदूषण मापनासाठी आज कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** संपूर्ण जग आज कोणत्या न कोणत्या पर्यावरणीय प्रश्नांना सामोरे जात आहे. हवा प्रदूषण हा सध्या अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. औद्योगिकीकरण हा हवा प्रदूषण वाढवणारा एक महत्त्वाचा घटक आहे. औद्योगिकीकरणामुळे होणाऱ्या वायू प्रदूषकांच्या उत्सर्जनाची माहिती सामान्य नागरिकाला व्हावी, या दृष्टीने शिकागो विद्यापीठाच्या या संस्थेने राज्यातील महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने एक प्रदूषण मूल्यमापन प्रणाली उपयोगात आणली आहे. या प्रणालीची माहिती देण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभाग आणि उद्योग संवाद केंद्र आणि शिकागो विद्यापीठ एनर्जी विभाग या संस्थेच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन बुधवारी (दि. ८) सकाळी साडेअकरा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये द युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोचे ईशान चौधरी, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश राऊत हे विविध विषयांवर मांडणी करणार आहेत.

सकाळ

# हवा प्रदूषण मापनासाठी विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : औद्योगिकीकरण हा हवा प्रदूषण वाढविणारा एक महत्त्वाचा घटक आहे. याच औद्योगिकीकरणामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाच्या उत्सर्जनाची माहिती व्हावी, या दृष्टीने शिकागो विद्यापीठाने राज्यातील महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने 'स्टार रेटिंग प्रोग्राम' ही प्रदूषण मूल्यमापन प्रणाली उपयोगात आणली आहे. या प्रणालीची माहिती करून देण्याच्या उद्दिष्टाने शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभाग, उद्योग संवाद केंद्र आणि शिकागो विद्यापीठ एनर्जी पोलिसी या संस्थांतर्फे कार्यशाळेचे आयोजन उद्या (ता. ८) सकाळी साडेअकराला विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित केले आहे.

कार्यशाळेत कम्युनिकेशन अॅण्ड आउटरिच एनर्जी पोलिसि इन्स्टिट्यूट अॅट द युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोचे समन्वयक ईशान चौधरी, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड व पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश राऊत मार्गदर्शन करणार आहेत.

Kolhapur, Kolhapur-Today
08/08/2018 Page No. 8